भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर

**ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur**

An ISO 9001:2015 Certified Organisation

# XXIX कापूस हंगाम २०२३ – २४: साप्ताहिक पीक सल्ला

## (कालावधी ५ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२३)

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस डिसेंबर | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस डिसेंबर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 01 | 02 | 03 | 04 | 05 | 07 | 08 | 09 | 10 | 11 |
|  | धुळे | 0 | 0 | 5.5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नंदुरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 19 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अहमदनगर | 25 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद | 49.7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जालना | | | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बीड | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 1 | 0 | 0 |
| | नांदेड | 6.8 | 0 | 0 | 1.2 | 0 | 3 | 8 | 3 | 0 | 0 |
| | परभणी | 0 | 0.3 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 0 | 0 |
| | हिंगोली | 7.5 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 1 | 0 | 0 |
| | बुलढाणा | 24 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अकोला | 10.4 | 0.5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7.9 | 0 | 0 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4.4 | 2.9 | 0 | 0 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2.4 | 14 | 0 | 0 | 0 |
| | वर्धा | 0.6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 9.9 | 0 | 0 | 0 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3.2 | 31 | 5.3 | 0 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5.4 | 68 | 4.6 | 0 | 0 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | 0.1 to 2.4 मिमी | 2.5 to 15.5 मिमी | 15.6 to 64.4 मिमी | 64.5 to 115.5 मिमी | 115.6 to 204.4 मिमी |
| पावसाची श्रेणी | खूप हलका पाऊस | तुरळक पाऊस | मध्यम स्वरूपाचा पाऊस | मुसळधार पाऊस | अति मुसळधार पाऊस |

**पीक परिस्थिती:**

**अकोला:**

- अकोला येथे, मान्सूनपूर्व आणि मान्सून कापूस बोंड फुटण्याच्या व वेचणीच्या अवस्थेत आहे. जुलै मध्ये पेरणी केलेला कापूस बोंड विकास आणि बोंड फुटण्याच्या टप्प्यावर आहे.
- कापूस वेचणी सुरू आहे.
- गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी वर म्हणजेच नॉन बीटी आणि बीटी संकरीत कापसावर १०-१५% पर्यंत दिसून आला.

- काही शेतात पानावर ठिपके आढळून आले.

**नांदेड:**

- पीक वेचणीच्या अवस्थेत आहे.
- मावा आणि पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून आला.
- काही शेतात राखाडी बुरशी आढळून आली.
- कापूस वेचणी सुरू आहे.

**राहुरी:**

- राहुरी येथे पीक बोंड फुटण्याच्या ते वेचणीच्या अवस्थेत आहे.
- पेरणीच्या कालावधीनुसार दुसरी व तिसरी वेचणी सुरू आहे.
- फुलकिडे, मावा आणि पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी खाली नोंदवला गेला तर काही शेतात तुडतुडे आणि गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर दिसून आला.
- कपाशीच्या शेतात टोबॅको स्ट्रीक व्हायरस १%, राखाडी बुरशी १% आणि बोंड सड २ % नोंदवले गेले.

**पीक सल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी पुढच्या हंगामात गुलाबी बोंडअळीचा हल्ला टाळण्यासाठी डिसेंबरच्या शेवटी कापसाची संपूर्ण वेचणी करावी. नंतरच्या पिक अवस्थेत कपाशीवरील लालसरपणा टाळण्यासाठी १ % नत्र आणि १% मॅग्नेशियम सल्फेट ची फवारणी करावी. जर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी ओलांडला असेल, तर सायपरमेथ्रीन १०% ईसी @ १०- १५ मिली किंवा सायपरमेथ्रिन २५% ईसी @ ४-६ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी @ १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ १० मिली किंवा फेनप्रोपॅथ्रिन १०% ईसी@ १५-२० मिली किंवा फेनव्हॅलेरेट २० ईसी @ १० मिली किंवा अल्फा- सायपरमेथ्रीन १०% ईसी @ ६ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. परिपक्व बोंडे बाहेरील बाजूने कुजू नयेत यासाठी प्रॉपिकोनाझॉल २५% इसी १ मिली किंवा प्रोपीनेब ७० डबल्यू पी २.५ - ३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि बोंडे अंतर्गत न कुजण्यासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डबल्यू पी २५-३० ग्रॅम पाण्याची फवारणी करावी. पानावरील बुरशीजन्य ठिपक्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी, कार्बेन्डाझिम १२ % + मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम किंवा क्रेसोक्सिम-मिथाइल ४४.३ एस सी @१० मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू +डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एस सी @१० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. शेतातून रोगट बोंडे आणि पिकांचे ढिगारे गोळा करून नष्ट करावे. वेगवेगळा संकरित कापूस स्वतंत्रपणे साठवावा. लवकर बीटी कापसाच्या वाणांची (१४०-१५ दिवसांची संकरित) काढणी केल्यानंतर, अधिक आर्थिक फायद्यासाठी शेतकऱ्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास चणा किंवा गहू यापैकी दुसरे रब्बी पीक घ्यावे.

नांदेड येथे, शेतकऱ्यांना पावसाचा अंदाज लक्षात घेऊन लवकरात लवकर कापूस वेचण्याचा सल्ला दिला आहे. कापूस साठवण्यापूर्वी वाळवावा. ओला कापूस वेचू नये. कापूस वेचणीनुसार बियाणे वेगळे साठवावे. रसशोषक कीटक आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास ऍसिटामिप्रिड २० एसपी @२ ग्रॅम किंवा फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ४ ग्रॅम किंवा डायनोटेफुरॉन २० एसजी @ ३ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. राखाडी बुरशीचे व्यवस्थापन करण्यासाठी, क्रेसोक्सिम-मिथाइल ४४.३ एस सी @१० मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एस सी @१० मिली किंवा

कार्बेन्डाझिम १२ % + मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फक्त पूर्ण उघडलेले बोंडांचीच वेचणी करावी आणि कापूस स्वच्छ कोरड्या जागी साठवावा. वेगवेगळा संकरित कापूस स्वतंत्रपणे साठवावा. कापूस साठवण्यापूर्वी सावलीत वाळवावा. वेचणीच्या वेळेवर नायट्रोजन देऊ नये. डिसेंबरच्या शेवटी कापसाची संपूर्ण वेचणी करून पीक नष्ट करावे. शेतातून रोगट बोंडे आणि पिकांचे ढिगारे गोळा करून नष्ट करावे.

राहुरी येथे, ज्या शेतकऱ्यांनी वेचणी पूर्ण केली नाही त्यांनी पूर्णपणे उघडलेले स्वच्छ कापसाचे बोंडे उचलणे सुरू करावे. बाजारात चांगला भाव मिळण्यासाठी प्रादुर्भाव नसलेला आणि गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव झालेला कापूस वेगवेगळा निवडावा. रसशोषक कीटक आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास थायामेथॉक्सम २५ डब्ल्यूजी @ २ ग्रॅम किंवा डायनोटेफुरॉन २०% एसजी @ ३ ग्रॅम किंवा फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ४ ग्रॅम किंवा डायफेंथियुरॉन ५० डब्लूपी @ १२ ग्रॅम किंवा बुप्रोफेझिन २५ एससी @ २०मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी ओलांडला असेल, तर सायपरमेथ्रीन १०% ईसी @ १०- १५ मिली किंवा सायपरमेथ्रिन २५% ईसी @ ४-६ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी @ १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ १० मिली किंवा फेनप्रोपॅथ्रिन १०% ईसी@ १५-२० मिली किंवा फेनव्हॅलेरेट २० ईसी @ १० मिली किंवा अल्फा- सायपरमेथ्रीन १०% ईसी @ ६ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीचे मास ट्रॅपिंगसाठी फेरोमोन सापळे @१०/एकर शेवटची वेचणी पूर्ण होईपर्यंत ठेवावे. पानावरील बुरशीजन्य ठिपक्यांचे आणि राखाडी बुरशीच्या व्यवस्थापणासाठी क्रेसोक्सिम-मिथाइल ४४.३ एस सी @१० मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू +डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एस सी @१० मिली किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम प्रती१० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कार्बेन्डाझिम १२% मॅनकोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ ४ ग्रॅम किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी @ १० मिली किंवा मेटीराम ५५ % + पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्ल्यूजी @ २० ग्रॅम किंवा अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्लू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी @ १० मिली किंवा फ्लूक्सापायरॉक्साड १६७ ग्रॅम/ लिटर + पयरक्लासट्रोबीन ३३३ ग्रॅम/ लिटर एससी @ ६ मिली १० लिटर पाण्यात मिसळून बोंड सड रोगाच्या संकुलाचे व्यवस्थापन करावे. शेत पार्थेनियम पासून मुक्त ठेवावे आणि कापसात टोबॅको स्ट्रीक व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फुलकिड्यांचे व्यवस्थापन करावे. शेतातून रोगट बोंडे आणि पिकांचे ढिगारे गोळा करून नष्ट करावे.

Detailed information regarding cotton production technology, e.g. selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc. can be availed from an android based **CICR Cotton App** developed by ICARCICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google play store. Additionally, the crop growth stage specific and weather based weekly advisory are uploaded on the website of ICAR-CICR also to be consulted for the benefit of farmers.